ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख २० जून, १९६२ | अंक ११

## विविध माहिती

**हिटलरच्या सहकाऱ्याचा अंत**—हिटलरच्या राजवटींत ज्यूंचा निःपात करण्याचें काम करणारा जर्मन अधिकारी ॲडॉल्फ आइखमन ह्याला इस्राएल सरकारनें फांशीं दिलें. हिटलरच्या हुकुमाप्रमाणें त्यानें ६० लाख ज्यू लोकांना यमसदनाची वाट दाखविली होती. युद्धोत्तरकाळांत तो अनेक देशांतून गुप्त रीतीनें राहिला होता. अखेर इस्राएल सरकारच्या गुप्त पोलिसांनीं त्याला अर्जेंटायना देशांत पकडले होते.

**दोन संस्थानिकांच्या तनख्यांत कपात**—ग्वाल्हेर व इंदूर ह्या संस्थानांच्या माजी राज्यकर्त्यांना मिळणाऱ्या तनख्यांत मिळून २५ लाख रुपयांची कपात करण्यांत आली आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ग्वाल्हेरच्या संस्थानिकाचा तनखा २५ लाखांवरून १० लाखांवर आणण्यांत आला आणि इंदूरच्या संस्थानिकाचा तनखा १५ लाखांवरून ५ लाखांवर आणण्यांत आला.

**मुसोलिनीचें आत्मचरित्र**—इटलीचा दिवंगत हुकूमशहा मुसोलिनी इटलीचा सर्वाधिकारी होण्यापूर्वी समाजवादी चळवळींत भाग घेत असे. ह्या चळवळींत त्याला तुरुंगवासाची शिक्षा झालेली होती. तुरुंगांत असतांना त्यानें स्वतःच्या आत्मचरित्राचीं ४० पानें स्वतःच्या हातानें लिहून काढलीं होतीं. त्यांत १९१२ पर्यंतचीच हकीगत आलेली आहे. हें हस्तलिखित लंडनमधील एका प्रकाशकानें ५,८८० डॉलर्सना विकत घेतलें आहे.

**सिकिमच्या महाराजकुमारांचा विवाह**— सिकिमचे महाराजकुमार एका अमेरिकन तरुणीशीं विवाहबद्ध होणार आहेत. त्यांची गांठ दार्जिलिंग येथील एका हॉटेलांत पडली. ही अमेरिकन तरुणी भारतांत बुद्धधर्माचा अभ्यास करण्यासाठी आली होती. सध्यां ती अमेरिकेला परत गेली आहे. लग्नाच्या वाटाघाटी करण्यासाठी महाराजकुमार स्वतःच लवकर अमेरिकेला जाणार आहेत.

**कातड्याच्या संशोधनाला मदत**—मद्रास राज्यांतील गिंडी येथील मध्यवर्ती कातडी संशोधन केंद्राला अमेरिकेच्या शेतकी खात्यातर्फे ३ लाख रुपयांची मदत मिळणार आहे. ही मदत पांच वर्षांच्या कालावधींत देण्यांत येईल. दोन अमेरिकन तज्ज्ञ संशोधनाबाबत सल्ला देण्यासाठी भारतांत येणार आहेत.

**औरंगाबादेंत हिंदीभवन**—औरंगाबाद येथें हिंदीभवनासाठी बांधण्यांत येणाऱ्या इमारतीच्या पायाचा दगड समारंभपूर्वक बसविण्यांत आला. औरंगाबादच्या हिंदी प्रचारसभेमार्फत ती बांधण्यांत येत आहे. इमारतीसाठी लागणारी जागा नगरपालिकेकडून देणगी म्हणून मिळालेली आहे. त्याशिवाय हैदराबाद हिंदी प्रचारसभेकडून १० हजार रुपयांची देणगी मिळालेली आहे.

**दक्षिण भारतांत तेलाचा कारखाना**—दक्षिण भारतांत तेल शुद्ध करण्याचा कारखाना काढण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारत सरकारनें दोन तज्ज्ञांचें मंडळ नेमलें आहे. तज्ज्ञांपैकी एक भारतीय असून दुसरा फ्रेंच आहे. ह्या मंडळानें आंध्र प्रदेशाचा दौरा पुरा केला असून आतां तें मद्रास व केरळ राज्यांतून फिरणार आहेत. संकल्पित कारखान्यांत आयात केलेलें तेल शुद्ध केलें जाईल. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येईल.

**नॉर्वेकडून मिळणारी मदत**—नॉर्वेकडून भारत व इतर मागासलेल्या देशांना आर्थिक मदत दिली जाते. ह्या मदतीचें काम सूत्रबद्ध करण्यासाठीं आतां एक मध्यवर्ती संघटना उभारण्यांत येणार आहे. संघटनेतर्फे मदतीच्या कामासाठी ५·५ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. कांहीं काळानें मदतीची रक्कम २० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. नॉर्वेकडून भारतामधील मच्छीमारीच्या धंद्याला विशेष मदत होत असते.

**रशिआंत भारताची सर्कस**—सांस्कृतिक देवाणघेवाणींतील एक भाग म्हणून भारतामधील एक सर्कस लवकरच रशिआला जाणार आहे. जैमिनी सर्कस हें तिचें नांव आहे. ह्या सर्कशींत ७० स्त्री—कलाकार आहेत आणि अनेक प्रकारचे जंगली प्राणी आहेत. रशिआंतील एक धंदेवाईक सर्कसवाला भारतांत येणार असून सर्कशींतील खेळाडूंना कामें शिकविणाऱ्या शाळेबाबत तो सल्ला देणार आहे.

**शिक्षकांना शिक्षण देणारी शाळा**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मध्यवर्ती सरकार शिक्षकांना शिक्षण देणाऱ्या ४ संस्था स्थापन करणार आहे त्यांपैकी एक भोपाळ येथें काढण्यांत येणार आहे. भोपाळ येथील संस्थेंत उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात व महाराष्ट्र ह्या राज्यांतील उमेदवारांना पदवीपर्यंतचें व नंतरचें शिक्षण घेण्यासाठी प्रवेश दिला जाईल. भोपाळमधील संस्थेसाठी १०८ एकर जमीन मिळवून देण्यांत आली आहे.

**रिहंड धरणावरील विजेंत वाटा**—उत्तर प्रदेशांत बांधण्यांत आलेल्या रिहंड धरणावर उत्पन्न होणाऱ्या विजेंतील कांहीं वाटा मध्य प्रदेशाला पाहिजे आहे. ह्यासंबंधीं उभयतां राज्यांचे मुख्यमंत्री येत्या ऑगस्टमध्यें भोपाळ येथें चर्चा करणार आहेत. रिहंड धरणांत जें पाणी सांठविलें जातें, त्यांपैकी कांहीं पाणी मध्य प्रदेशांतून येतें. म्हणून मध्य प्रदेशचें सरकार विजेवर हक्क सांगत आहे.

**झेकोस्लोव्हाकिआंतील चित्रपटमहोत्सव**— झेकोस्लो-हाकिआंत भरविण्यांत आलेल्या तेराव्या चित्रपटमहोत्सवांत अमे-केसह ४३ देशांनीं भाग घेतला. ह्या महोत्सवांत भाग घेण्याचा मेरिकेचा हा पहिलाच प्रसंग आहे. भारतातर्फे गंगाजमना हा ईंदी बोलपट दाखविण्यांत आला. महोत्सवांत भाग घेण्यासाठी ोलपटाचे दिग्दर्शक, नट दिलीपकुमार आणि नटी वैजंतीमाला से तिवे प्रतिनिधि गेले होते.

**स्फोटक द्रव्यांचा कारखाना**—मध्यप्रदेशांत स्फोटक व्यांचा कारखाना काढण्याचा परवाना मध्यवर्ती सरकारनें एका ाजगी मालकीच्या कंपनीला दिला आहे. भारतांत अशा प्रका-चा हा दुसरा कारखाना असून त्याची उभारणी परदेशाच्या ाह्यानें करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ४ ोटी रुपयांचें भांडवल लागणार आहे. उभारणीच्या कामास वकरच प्रारंभ होईल अशी अपेक्षा आहे.

**हातमागाच्या सहकारी संस्था**—गेल्या कांहीं वर्षांत बेहारमधील विणकरांच्या सहकारी संस्थांत खूप वाढ झाली भाहे. आतां ह्या संस्था दरसाल २ कोटी रुपये किंमतीचें कापड नेर्माण करतात. ह्या संस्था आणि इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन मिळून एक सुताची सहकारी गिरणी काढणार आहेत. गिरणीच्या स्थापनेसाठी ४६ लाख रुपये भांडवल लागणार आहे. चालू आर्थिक वर्षाच्या अखेरीस सुताच्या उत्पादनास प्रारंभ होईल.

**मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी खास सोय**—उत्तर प्रदेशांतील असह्य उन्हाळा टाळण्यासाठी राज्याच्या मंत्रिमंडळाच्या उन्हाळी बैठका थंड हवेच्या ठिकाणीं भरविण्यांत येत असत. परंतु आतां हें स्थलांतर कायमचें रद्द करण्यांत आलें आहे. राज्याच्या सचिवालयांतच आतां एक खास बैठकीची जागा बांधण्यांत आली आहे. तिचें हवामान सुखद राखण्याची सोय केली आहे.

**त्रिवेंद्रम्‌जवळ कापडाची गिरणी**—त्रिवेंद्रम्‌जवळ कापडाची गिरणी काढण्याचा परवाना एका उद्योगपतीला देण्यांत आला आहे. गिरणींत सुत काढणें, विणणें, रंग देणें, इत्यादि सर्व प्रकारचीं कामें करण्यांत येतील. गिरणीच्या उभारणीसाठी २-५ कोटी रुपये खर्च येणार असून तीमधील उत्पादन फक्त निर्यातीसाठी करण्यांत येईल. दक्षिण भारतांत अशा प्रकारची ही पहिलीच गिरणी होईल.


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर




## बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर,
कोट व पाळ.

**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

## ★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची ट्रिक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

दातांच्या स्वच्छतेसाठी
## ★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. २० जून, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चीनकडून होणारी कच्च्या अफूची निर्यात

संयुक्त-राष्ट्र-संघटनेची, मादक पदार्थांच्या व्यापाराबद्दल व उत्पादनाबद्दल कार्य करणारी एक उपसंघटना आहे. ह्या उपसंघटनेच्या बैठकींत अमेरिकेच्या प्रतिनिधीनें अशी माहिती सांगितली आहे कीं, चीन सध्यां कच्च्या अफूची चोरटी निर्यात मोठ्या प्रमाणावर करीत आहे. ह्या निर्यातीमुळें चीनला पौंड व डॉलर्स ही परदेशीय हुंडणावळ अर्थातच प्राप्त होते. चीनच्या युनान प्रांतांतून कच्ची अफू लादलेलीं हजारों खेचरें सयाममध्यें येतात व तेथून नंतर ब्रह्मदेशांतील शान संस्थानांत येतात, अशी माहिती अमेरिकेच्या प्रतिनिधीनें सांगितली आहे. ह्या अफूचें कोठेंतरी 'हिरॉइन' ह्या नांवाच्या मादक पदार्थांत रूपांतर करण्यांत येतें व मग तें हाँग-काँग-मकाओ ह्या वसाहतींच्या मार्गानें अमेरिकेंत नेण्यांत येतें. ह्या मादक पदार्थाला अमेरिकेंत फार मोठी मागणी असते. 'हिरॉइन' चें बेकायदा उत्पादन व व्यापार ह्यांनीं अमेरिकन सरकारला एक डोकेंदुखीच निर्माण केली आहे. ह्या चोरट्या धंद्यांत भरमसाठ नफा असतो. अमेरिकेच्या बाजारांत पोचेंपर्यंत एक औंस 'हिरॉइन' ची किंमत ३,००० डॉलर्सपेक्षा अधिक झालेली असते. त्याच्या सेवनाचें अगर तें टोंचून घेण्याचें व्यसन अमेरिकेंत खूपच फैलावलेलें आहे. त्यामुळें वाटेल ती किंमत देऊन हा पदार्थ मिळविण्यास व्यसनी लोक तयार असतात. युद्धोत्तर काळांत तर हा चोरटा व्यापार आणखीनच वाढला आहे. गेल्या कांहीं वर्षांत जपानमध्यें व अमेरिकेंत पोलिसांनीं 'हिरॉइन' चे अनेक बेकायदा साठे जप्त केले, त्यांपैकी दोनतृतीयांश भाग युनान, ब्रह्मदेश, सयाम अगर लाओस ह्या भागांतून आलेला होता. सुमारें १०० वर्षांपूर्वी पश्चिम युरोपांतील देशांनीं चीनमध्यें जबरदस्तीनें अफूची निर्यात केली. आतां हा व्यापार उलट्या दिशेनें चालूं झाला आहे.

---

## गुजरात राज्यांतील मच्छीमारीचा धंदा

गुजरात राज्यांत मच्छीमारीचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. गुजरातच्या किनाऱ्यानें चालणाऱ्या मच्छीमारीच्या धंद्यामुळें मुंबई, दिल्ली, अशा मोठ्या शहरांना माशांचा पुरवठा करतां येतो. खुद्द गुजराती लोक शाकाहारी असल्यानें पकडलेल्या माशांना चांगली बाजारपेठ मिळविण्याचा प्रश्न राज्य सरकारपुढें नेहमींच उभा असतो. गुजरात राज्याला सुमारें १,००० मैल लांबीचा समुद्र-किनारा लाभला आहे. ह्या किनाऱ्यानजीक अनेक प्रकारचे मासे विपुल प्रमाणांत सांपडतात. मच्छीमारीच्या धंद्यामुळें ३०,००० कोळी व त्यांचीं कुटुंबें पोसलीं जातात. शिवाय, धंद्याला पोषक असे अनेक प्रकारचे छोटे उद्योगधंदे निघालेले आहेत. १९६०-६१ सालांत गुजरातमधील मच्छीमारीच्या केंद्रांतून ८४,००० मेट्रिक टन वजनाचे मासे पकडण्यांत आले. राज्य सरकारला माशांच्या धंद्यापासून चांगलें उत्पन्न होतें. गुजरातमध्यें माशांची विपुलता आहे. मासे व त्यापासून बनविलेले पदार्थ ह्यांची राज्याबाहेर मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यांत येते. मुंबई ही माशांची मोठी बाजारपेठ आहे. मुंबई शहरांत सुमारें १ कोटी रुपयांचे वाळवलेले मासे व ८० लाख रुपयांचें ताजे मासे खपतात, असा अंदाज आहे. गुजरातमधील कांहीं विशिष्ट प्रकारचे मासे परदेशांत फार लोकप्रिय झालेले आहेत. मलाया, हाँगकाँग, इंग्लंड, इतक्या दूरहि माशांची निर्यात करण्यांत येते. माशांची समृद्धि असल्यामुळें त्यांना बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्न नेहमींच करावे लागतात. माशांच्या उत्पादनांत नुसती वाढ करून धंद्यांत गुंतलेल्या कोळ्यांचा फायदा होणार नाहीं, ह्याची सरकारला जाणीव आहे. माशांची विक्री सहकारी पद्धतीनें करण्यासाठी संघटना उभारण्यांत आली असून त्यामुळें उत्पादकांना चांगला फायदा होत आहे.

---

## तिसऱ्या कार्यक्रमांतील औद्योगिक वसाहती

भारतांत आर्थिक नियोजन सुरू झाल्यानंतर दोन पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडण्यांत आले. आतां तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची वाटचाल चालूं झालेली आहे. ह्या कार्यक्रमांत औद्योगिक वसाहतींना बरेंच महत्त्व देण्यांत आलें आहे. देशाचें औद्योगीकरण घडवून आणण्यासाठी भारी उद्योगधंदे व मूलभूत उद्योगधंदे ह्यांची जरूरी तर आहेच आहे, परंतु औद्योगीकरणांत छोट्या उद्योगधंद्यांनाहि मानाची जागा आहे. हे उद्योगधंदे बहुधा औद्योगिक वसाहतींतून काढण्यांत येतात. मोठ्या उद्योगधंद्यांना लागणारे उपपदार्थ छोटे उद्योगधंदे बनवीत असतात. त्याचबरोबर कुशल कामगारांना शिक्षण देण्याचें कामहि ते करतात. कुशल कामगारांची वाण पडूं लागली तर अत्याधुनिक उत्पादन-तंत्राहि फारसें उपयोगाचें ठरत नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत औद्योगिक वसाहती व तांत्रिक कामाचे कारखाने ह्यांच्यासाठीं ३० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. देशाच्या सर्व भागांत औद्योगिक वसाहतींची स्थापना करण्यांत येणार आहे. सर्व प्रादेशिक विभागांचा सारखा विकास व्हावा असा हेतु ह्यामागें आहे. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, ह्या राज्यांनीं औद्योगिक वसाहतींच्या बाबतींत चांगली प्रगति केली आहे. आतां औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या राज्यांकडे अधिक लक्ष देणें अगत्याचें आहे. औद्योगिक वसाहतींची स्थापना करतांना औद्योगिक शक्ति आणि वहातुकीची व्यवस्था ह्यांचा विचार आधीं करावा लागतो. अर्थातच ह्या वसाहती शहरांच्या आसपास काढण्याकडे कल दिसून येतो. पण, ह्या प्रवृत्तीला आळा घालण्यांत आला पाहिजे असे तज्ज्ञांचें मत आहे. कारण त्यामुळें औद्योगीकरण केंद्रीभूत होत जाते.

---

**योगसंशोधन केंद्र**—भारत साधु समाज या संघटनेनें दिल्ली येथें एक संशोधन केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या संशोधन केंद्रांत योगिक प्रक्रियांचे व आसनादि व्यायामांचे संशोधन करण्यांत येणार आहे. त्याशिवाय वैदिक वाङ्मय, आयुर्वेद व ज्योतिष, ह्या विषयांचेंहि संशोधन करण्यांत येणार आहे.

## स्त्रियांना पडद्यांत बंदिस्त ठेवण्यास घटना मदत करणार नाहीं

“आपल्या स्त्रियांना पडद्यांत ठेवणाऱ्या लोकांच्या भावना पाळण्यासाठीं इतर नागरिकांना त्यांच्या घरांचे नकाशे आणि उभारणी बदलण्यास भाग पाडण्याचा सध्यांच्या घटनेप्रमाणें सरकारला अधिकार आहे किंवा नाहीं, ह्याबद्दल मला दाट शंका आहे.” असे विचार अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायमूर्ति धावन ह्यांनीं एका निवाड्यामध्यें नमूद केले आहेत. बसाई नांवाच्या इसमानें आपल्या स्वयंपाकघरांतील भिंतीला धूर जाण्यासाठीं भोंक ठेवलें होतें, त्यांतून आपल्या घराच्या अंगणांतलें दिसतें आणि त्या अंगणांत पडदानशीन स्त्रिया वावरतात; तेव्हां बसाईला तें भोंक बंद करायला लावावें, असा हसन राझा खानचा दावा होता. मूळ कोर्टानें हा दावा अमान्य केला होता, पण सिव्हिल जज्जानें पडदानशीन स्त्रियांच्या भावनांना महत्त्व देऊन हसन राझा खानाचा अर्ज मंजूर केला होता. बसाईनें त्यावर केलेलें अपील मान्य करून, हायकोर्टानें मूळ कोर्टाचा निवाडा उचलून धरला. वादीनें ७५ वर्षांपूर्वींच्या एका निवाड्याचा आधार घेतला होता. पण त्या वेळची सामाजिक परिस्थिति वेगळी होती. सामाजिक चालीरीतीपासून अलिप्त राहून, त्यांत बदल घडूं न देण्याचें त्या वेळच्या सरकारचें धोरण होतें; मग त्या चालीरीती कितीहि अनिष्ट कां असेनात. आतां हिंदूंच्यामध्यें पडद्याची चाल नष्ट झाली आहे; मुसलमानांपैकीं बहुतेकांनीं पडद्याचा त्याग केलेला आहे. इजिप्त, टर्की, उझबेकिस्तान, ताश्कंद, इंडोनेशिया, ह्यांतच नव्हे तर पाकिस्तानच्या इस्लामी राज्यांतहि पडद्याची चाल अनिष्ट मानली जात आहे; अगदीं मागासलेल्यांची गोष्ट वेगळी. ज्या सामाजिक तत्त्वावर आपली राज्यघटना आधारलेली आहे, त्या तत्त्वांशीं स्त्रियांना पडद्यांत ठेवणें सुसंगत नाहीं. सरकार आपल्या नागरिकांत स्त्री-पुरुष असा भेदाभेद करणार नाहीं; दोघांनाहि उपजीविकेच्या साधनांच्या प्राप्तीचा समान अधिकार आहे; समान कामाला समान पगार सांगितलेला आहे. स्त्रियांना (पण पुरुषांना नाहीं) बंदिस्त ठेवणाऱ्या चालीचा ह्या मूलभूत तत्त्वांशीं मेळ बसत नाहीं.

### तीन भाषांत बोलणारा लोकसभेचा सभासद

लोकसभेच्या चालू अधिवेशनांत रेल्वेचें अंदाजपत्रक मांडण्यांत आल्यावर त्यावर रीतसर चर्चा सुरू झाली. चर्चेत भाग घेतांना प्रजासमाजवादी पक्षाचे सदस्य श्री. गुप्ता ह्यांनीं तीन भाषांतून बोलण्यास प्रारंभ केला. ते मधूनच हिंदी व बंगाली भाषा वापरूं लागले. भाषणाची सुरुवात मात्र त्यांनीं इंग्रजींतून केली. ह्या प्रकारामुळें लोकसभेंतील भाषणांचे अधिकृत वृत्तांत टिपून घेणारांची तारांबळ उडाली. अखेर सभापति सरदार हुकूमसिंग ह्यांनीं त्यांना हिंदींतून अगर इंग्रजींतून भाषण करण्याची सूचना केली, व ती त्यांनीं मानली. श्री. गुप्ता ह्यांना इंग्रजी, हिंदी, बंगाली बरोबरच आसामी भाषाहि येते.

### नृत्यनाटिकांत रशिआ आघाडीवर

दक्षिण भारतामधील संगीतज्ञ, प्राध्यापक-सांबमूर्ती मॉस्को येथील आंतरराष्ट्रीय संगीत परिषदेला गेले होते. ही परिषद दर चार वर्षांनीं भरविण्यांत येते. गेल्या परिषदेंत ३२ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला होता. प्रा. सांबमूर्ती ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, नृत्य-नाटिकांच्या बाबतींत रशिआ आघाडीवर आहे. भारतीय पुराणांतील नलदमयंती आख्यान आणि शकुंतला आख्यान ह्या विषयांवर रशिअन लेखकांनीं नृत्यनाटिका लिहिल्या आहेत.

### कीटकनाशक औषधांचा दुरुपयोग


ढेकूण, झुरळें, मुंग्या, इत्यादि कीटकांचा नाश करणारीं अनेक प्रकारचीं विषारी औषधें बाजारांत मिळतात. त्यांचा उपयोग करून आयुष्याला कंटाळलेलीं माणसें आत्महत्या करतात. गुजरातमध्यें अशा रीतीनें आत्मघात करून घेणारांची संख्या वाढत आहे असें राजकोट नगरपालिकेनें मिळविलेल्या माहितीवरून दिसतें. विषारी औषधांचा असा उपयोग करण्यांत येऊं नये म्हणून गुजरात सरकार उपाय योजणार आहे.

### नर्मदा खोरें-योजना

मध्यप्रदेश व गुजरात राज्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक जबलपूर येथें भरली होती. नर्मदा नदीच्या खोऱ्याच्या विकासासंबंधीं बैठकींत चर्चा करण्यांत आली. त्याचप्रमाणें, विकासासाठीं लागणारा पैसा कसा उभा करावा ह्याविषयींहि विचारविनिमय करण्यांत आला. नर्मदा नदीच्या खोऱ्याचा विकास घडवून आणण्यासाठीं ३०० कोटी रुपये खर्च येणारी योजना आंखण्यांत आलेली आहे.

### हवामानाची माहिती मिळविण्यांत सहकार्य

हवामानाची माहिती मिळविण्यासाठीं रशिआ व अमेरिका हे देश छोटे उपग्रह आकाशांत सोडतात. अशा उपग्रहांच्या मार्फत मिळविलेली माहिती आतां जाहीर करण्यांत येणार आहे. उभयतां देशांच्या शास्त्रज्ञांत ह्यासंबंधीं विचारविनिमय चालू होता. तथापि उपग्रह सोडण्याच्या प्रत्यक्ष कार्यांत मात्र उभयतां देश सहकार्य करण्यास तयार नाहींत.


आज पगाराचा दिवस. महिनाभराच्या कामाचा मोबदला आज तुमच्या खिशांत आहे आणि त्यावर सबंध महिनाभर तुम्हांला तुमचा संसार चालवायचा आहे.

पगाराची रोख रक्कम खिशांत बाळगून एखाद्या खिसेकापूकडून ते गमावण्याचा धोका आपण कां पत्करतां! ते बँकेंत टाका आणि वेळोवेळीं जरुरी पुरतेच पैसे काढा.

बँकेत खाते असण्याचा हा फायदा तुम्हांला

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

मध्यें पुरेपूर मिळेल, त्यांना लहान आणि मोठ्या रकमांबद्दल सारखाच आदर आहे.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें-२ तार : MAHABANK

महाराष्ट्रांत व इतरत्र सर्वत्र बँकेच्या शाखा आहेत.

M.B. 62.7

### वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचें उत्पादन

बिहार पेपर मर्चंटस असोसिएशनची ७ वी वार्षिक परिषद पाटणा येथें भरली होती. परिषदेचें उद्घाटन करतांना बिहारचे उप-उद्योगमंत्री म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतामधील कागदाचें उत्पादन दुप्पट करण्यांत येईल. सध्यां चालू असलेल्या कारखान्यांपैकी कांहीं कारखान्यांना विस्तार करण्याची परवानगी देण्यांत आली आहे. कांहीं नव्या कारखान्यांनाहि परवाने देण्यांत आले आहेत. कागदाच्या गिरण्यांची सध्याची उत्पादनक्षमता ४,१०,००० टन आहे; ती तिसऱ्या कार्यक्रमाच्या शेवटीं ८,२०,००० टनांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. वृत्तपत्रांना लागणाऱ्या कागदाचें उत्पादन सध्यां ३०,००० टनांच्या आसपास आहे, तें १,५०,००० टनांपर्यंत वाढविण्यांत येईल. नेपा येथील कागदाच्या गिरणीची उत्पादनक्षमता दुप्पट करण्यांत येणार आहे.

### तिबेटशीं होणारा व्यापार थंडावला

तिबेटमध्यें ग्यांटसे आणि यातुंग ह्या दोन ठिकाणीं भारतामधील व्यापाऱ्यांच्या संघटना होत्या. चीन आणि भारत ह्यांच्या दरम्यानच्या व्यापारी कराराची मुदत वाढविण्यांत आल्यामुळें वरील दोन्हीं ठिकाणचीं व्यापारी ठाणीं उठविण्यांत आलीं आहेत. भारताचा तिबेटशीं व्यापार सुमारें १०० वर्षांपूर्वीं सुरू झालेला आहे. तिबेटमधील हिंदी अधिकारीहि भारतांत येण्यास निघाले आहेत. कॉलिंपॉंग हें ठिकाण तिबेट व भारताच्या दरम्यान होणाऱ्या व्यापाराचें केंद्र समजलें जातें. तेथील व्यापाऱ्यांनीं भारत सरकारला तांतडीची उपाययोजना करण्याची विनंती केली आहे.

### जगांतील तांदुळाचें उत्पादन व निर्यात

कॉमनवेल्थ आर्थिक समितीचें तांदुळाच्या उत्पादनासंबंधींचें वार्तापत्र नुकतेंच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. वार्तापत्रांत देण्यांत आलेल्या माहितीमुळें तांदुळाच्या जागतिक उत्पादनावर चांगला प्रकाश पडत आहे आणि तांदुळाची उत्पादनाची दिशा समजण्यासहि मदत होत आहे. भात पिकविणाऱ्या सर्व देशांत भारताचा अनुक्रम पहिला लागतो. आशिआ खंडांतील देशांत रोजच्या जेवणांत भात खाणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. १९६१-६२ सालीं जगांतील भाताचें उत्पादन त्यामागील वर्षाच्या हंगामांतील उत्पादनाइतकेंच झालें. तांदुळाच्या उत्पादनाचा हा उच्चांक मानला जातो. उत्पादनांत चीन व रशिआ ह्या देशांचें उत्पादन जमेस धरण्यांत आलेलें नाहीं. जपान, पाकिस्तान व ब्रह्मदेश ह्या देशांतील तांदुळाचें उत्पादन १९६०-६१ च्या उच्च पातळीच्या आसपास राहिलें, त्यामुळें हें शक्य झालें. सयाममध्यें तांदुळाच्या पिकाची पुरामुळें बरीच हानि झाली. त्यामुळें तेथील उत्पादन थोडेंफार घटलें. तांदुळाच्या निर्यातीबाबतचें चित्र पुढीलप्रमाणें दिसतें. १९६० च्या मानानें १९६१ सालामधील तांदुळाचा व्यापार ५ टक्यांनीं कमी झालेला दिसून येतो. चीन व रशिआ ह्या देशांनीं निर्यात केलेला तांदूळ ह्या हिशेबांतून वगळण्यांत आला आहे. सुएझ कालव्याच्या अधिकाऱ्यांनीं सादर केलेल्या अहवालाप्रमाणें १९६१ सालीं चीनकडून रशिआकडे अवघा १,२४,००० टन तांदूळ रवाना झाला. १९६० सालीं चीननें रशिआला ४,२९,००० टन तांदूळ पुरविला होता. रशिअन गटांतील देश सोडून इतर तांदूळ आयात करणाऱ्या देशांचे आंकडे पाहिले तर १९६१ सालीं चीननें १९६० पेक्षा निम्म्यानें कमी तांदुळाची निर्यात केली असें


**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

**१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०**

**२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००**

★ होतकरू संसारी तरुण-तरुणींसाठी ★

श्री. वा. काळे ह्यांचें मार्गदर्शक हितगुज

**कण आणि क्षण रु. २=५०**

**पुढे पाऊल रु. २=००**

**तुमचें स्थान कोणतें? रु. २=००**

ह्या यशस्वी पुस्तकांची भेट देऊन तुमचें शुभचिंतन प्रभावी करा!

—अभिनव पुस्तकमंदिर, पुणें ४.—

★ सुवर्ण-महोत्सवी वर्ष ★

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**

(दि विदर्भ सहकारी बँक लिमिटेड सम्मीलित)

मुख्य कचेरी— १, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई टेलिफोन नं. २५५४७४-७५

विभागीय कचेरी— महाल-नागपूर तारेचा पत्ता— फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रुझ

: नागपूर विभागांतर्गत शाखा :

(१) सिताबर्डी (२) अमरावती (३) चांदा (४) मलकापूर (५) खामगांव (६) बुलढाणा

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. ३ कोटी, ६० लाख |
| गंगाजळी व फंड | रु. १ कोटी, ४ लाख |
| ठेवी | रु. १९ कोटी, १० लाख |
| खेळतें भांडवल | रु. ५४ कोटी, ८६ लाख |

*महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.*

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

## कारखान्याच्या अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न
### रूरकेला येथील गंभीर परिस्थिति

रूरकेला स्टील प्लँटचे जनरल मॅनेजर, श्री. एस्. टी. राजा ह्यांनीं एक पत्रक काढून, कामगारांनीं आपल्या गाऱ्हाण्यांची दाद मागण्यासाठीं हिंसेचा अवलंब करूं नये, अशी विनंती केली आहे. त्याचप्रमाणें, कारखान्याच्या अधिकाऱ्यांना त्यांनीं सुरक्षिततेचें आश्वासन दिलें आहे. "शंभर टक्के संरक्षण देणें अशक्य आहे, पण अधिकारी घाबरून जाणार नाहींत आणि कामांत लक्ष घालतील" अशी आशा त्यांनीं व्यक्त केली आहे. पोलाद कारखान्याचे प्रमुख अधिकारी आणि कामगार संघटनेचे पुढारी, ह्यांची बैठक भरवून, श्री. राजा ह्यांनीं ह्या प्रश्नाची चर्चा केल्यावर, त्यांनीं वरीलप्रमाणें पत्रक काढलें. त्याची पार्श्वभूमि अशी:—

कारखान्यांतील एक फोरमन श्री. नारायणस्वामी, ह्यांचे डोक्यावरील प्रहारामुळें ते १९ मे रोजीं इस्पितळांत मृत्यु पावले. ७ मे रोजीं रूरकेला येथील एक हमरस्त्यावर कोणीतरी अज्ञात इसमानें त्यांचे डोक्यावर दगड मारला होता. जानेवारीपासून नारायणस्वामींना खुनाची धमकी दिली जात होती. श्री नारायणस्वामींचा जीव धोक्यांत असल्याचें जनरल मॅनेजरांनीं पोलिसास कळविलेंहि होतें.

गेल्या वर्षीं श्री. शेणॉय नांवाचे तरुण इंजिनियर रूरकेलामधून अचानक बेपत्ता झाले! पोलिसांना त्याचें कांहींहि कारण हुडकून काढतां आलें नाहीं. यंदा श्री. नारायणस्वामींच्या जीविताच्या धोक्याची पोलिसांना पूर्वकल्पना दिलेली असताहि त्यांच्या मृत्यूनंतर १५ दिवसांनींहि "अद्याप चौकशी चालू आहे." असें पोलिसांनीं उत्तर दिलें. अद्याप कोणासहि अटक झालेली नाहीं.

## अल्युमिनियम तयार करण्याचा नवा कारखाना

मध्यप्रदेशांतील बिलासपूर जिल्ह्यांत कोर्बा ह्या ठिकाणीं अल्युमिनियम तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत निघणार असून तो उभारण्याचे कामीं हंगेरीचें साह्य घेण्यांत येणार आहे. हंगेरिअन तज्ज्ञांनीं कारखान्याच्या जागेची नुकतीच पाहाणी केली. अल्युमिनियमचा कारखाना उभारण्यास कोर्बा हें ठिकाण अत्युत्तम असल्याचा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. कोर्बा येथील संकल्पित कारखान्यांतून तयार होणारें अल्युमिनियम जगांत सर्वांत स्वस्त ठरेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. कारखाना उभा राहिल्यावर अल्युमिनियमचा देशांतर्गत पुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढेल आणि ह्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचे मार्गावर आणखी एक महत्त्वाचें पाऊल टाकलें, असें होईल.

## नमुनेदार शेताच्या बाबतींत सहकार्य

म्हैसूर राज्यांतील मंड्या जिल्ह्यांत एका नमुनेदार शेताची स्थापना करण्यांत येणार असून ह्या कामीं डॅनिश सरकारचें साह्य मिळणार आहे. ह्याच जिल्ह्यांत शेतीबाबत संशोधन करणाऱ्या एका केंद्राला डेन्मार्कच्या सरकारची मदत ह्यापूर्वीच मिळालेली आहे. केंद्रांत ग्रामसेवकांना शिक्षण देण्याची सोयहि करण्यांत आली आहे. शेतासाठी ३०० एकर जमिनीची निवड करण्यांत आली आहे. जमिनीला पाण्याचा पुरवठा पुरेशा प्रमाणावर उपलब्ध आहे. डेन्मार्कचें सरकार शेतीसाठी लागणारी आधुनिक यंत्रसामग्री पुरवणार असून शिवाय कांहीं शेतीविषयक तज्ज्ञहि सल्ला देण्यासाठी पाठविणार आहे. आधुनिक तऱ्हेच्या गौळवाड्यासाठी ५०० डॅनिश गाईहि पाठविण्यांत येणार आहेत.

## मुंबईच्या बंदराचा विकास करण्यासाठीं कर्ज

मुंबईच्या बंदराचें आधुनिकीकरण घडवून आणून त्याचा विकास करण्यासाठी २७ कोटी रुपये खर्च येणारी योजना आखण्यांत आली आहे. ह्यापैकी ९ कोटी रुपये परदेशीय चलनाच्या स्वरूपांत लागणार आहेत. ही रक्कम इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशनकडून मिळणार आहे. डॉलर्सच्या चलनांत कर्जाची रक्कम १·८ कोटी डॉलर्स होईल. कर्जाच्या वाटाघाटी करण्यासाठी भारताच्या प्रतिनिधींचें एक मंडळ वॉशिंग्टनला रवाना झालें आहे. संपूर्ण योजना अमलांत आल्यावर मुंबई बंदरांत बराच बदल घडून आलेला दिसेल. बॅलर्ड पिअर धक्क्याचा विस्तार करणें, बंदरांतील गाळ काढणें, गोद्यांचा विस्तार करणें, एक इस्पितळ बांधणें, इत्यादि लहानमोठ्या कामांचा समावेश योजनेंत करण्यांत आला आहे.

## भारताला मदत देणाऱ्या मित्रराष्ट्रांची बैठक

भारताला आर्थिक मदत देणाऱ्या मित्रराष्ट्रांची बैठक २८ मे रोजीं वॉशिंग्टन येथें भरली होती. पण, मदतीसंबंधीं कोणताहि निर्णय न घेता ती तहकूब करण्यांत आली. आतां ही बैठक जुलै महिन्यापूर्वी होणार नाहीं अशी वार्ता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठी अमेरिकेनें ५० कोटी डॉलर्स देऊ केले आहेत. ही मदत देण्यापूर्वी अमेरिकन सरकारला कॉंग्रेसची मंजुरी मिळवावी लागेल. शिवाय अमेरिका सोडून इतर मित्रराष्ट्रांनीं ५० कोटी डॉलर्सची मदत केली, तरच अमेरिका आपल्या वाटणीची मदत देणार आहे. इतर राष्ट्रांनीं द्यावयाच्या मदतींत अद्याप सुमारें २२ कोटी डॉलर्सची तूट आहे. अमेरिकेनें आपली मदत देण्याचें इतर राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून ठेवूं नये असा आग्रह भारतातर्फे करण्यांत येणार आहे.

## मध्यप्रदेशांत दारूबंदीची शक्यता

मध्यप्रदेशाचें सरकार राज्यांत दारूबंदीचा कार्यक्रम क्रमाक्रमानें अमलांत आणण्याचा विचार करीत आहे. कार्यक्रमांतील पहिला टप्पा म्हणून सार्वजनिक ठिकाणीं दारू पिण्यास संपूर्ण बंदी करण्यांत येईल. राज्यांतील ज्या भागांत आदिवासींची वस्ती आहे त्या भागांत दारूबंदीचा आग्रह इतक्यांतच धरण्यांत येणार नाहीं. दारूबंदीचा कार्यक्रम अमलांत आणतांना फक्त सरकारी प्रयत्नांवर व कायद्यावर भर देण्यांत येईल, असें मात्र नाहीं. दारूबंदीच्या कार्यक्रमाविषयीं आस्था असणाऱ्या खाजगी संस्थांचेंहि सहकार्य सरकार घेणार आहे. दारूबंदीमुळें मध्यप्रदेश सरकारचें अबकारी कराचें बरेंच मोठें उत्पन्न बुडणार आहे. ह्या बुडणाऱ्या उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न मध्यवर्ती सरकारनें मदतीच्या रूपानें द्यावें, अशी मागणी राज्य सरकारतर्फे करण्यांत येण्याचा संभव आहे.

## रायपूरला अल्युमिनियमच्या पत्र्याचा कारखाना

अल्युमिनियमच्या ठोकळ्यापासून अल्युमिनियमचे पत्रे व अल्युमिनमचीं भांडीं तयार करण्याचा एक कारखाना मध्यप्रदेशांतील रायपूर ह्या ठिकाणीं नव्यानें उभारण्यांत आला आहे. कारखाना लवकरच प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल. मध्यप्रदेशांत काढण्यांत आलेला अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना आहे. रायपूर येथें एक औद्योगिक वसाहतहि स्थापन करण्यांत आली आहे.

# साहेबराव माधवराव सातकर

## उत्साही व धडाडीचें नेतृत्व



"अनुकूल परिस्थितीची वाट पहात न बसतां हातीं घेतलेलें कार्य दीर्घ परिश्रमानें, कर्तव्यबुद्धीनें आणि ध्येयवादी प्रेरणेनें सिद्धीस नेण्यास सतत धडपड करणें हें माझ्या जीवनाचें सार आहे" अशा स्फूर्तिदायक उद्गारानें आपल्या सहकाऱ्यांना कार्यप्रवण करीत असलेल्या श्री. साहेबराव माधवराव सातकर यांचें दर्शन अनेकांना झालेलें आहे.

भारतानें लोकशाही राज्यपद्धतीचा अवलंब केला आणि खास याच वेळीं श्री. साहेबराव सातकरांच्या मनांत सामाजिक कार्याची उर्मि उसळली. गरिबीनें गांजलेल्या लोकांच्या या देशामध्यें आपल्या शक्तिपरहस्तें नंदनवन करण्याची भावना त्यांना स्वस्त बसूं देई ना. म्हणून शेवटीं नोकरीवर लाथ मारून खेड ग्रामपंचायतीचे एक सामान्य सभासद म्हणून त्यांनीं आपल्या सामाजिक जीवनाला प्रारंभ केला. सहा महिन्यांच्या अल्पावधींत आपल्या मनमिळाऊ स्वभावानें आणि कार्यप्रवण रहाण्याच्या वृत्तीनें ते खेडमध्यें इतके लोकप्रिय झाले कीं, ग्रामपंचायतीच्या निवडणुकींत पंच म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली; आणि लवकरच ग्रामपंचायतींत त्यांच्या यशाचा मार्ग सरपंचापर्यंत येऊन पोहोंचला. त्यांच्या कर्तृत्वशक्तीला आतां वाव मिळाला होता. वर्षानुवर्षे खेड ग्रामस्थांचे पाण्याविषयीं होत आलेले हाल दूर करण्यासाठीं त्यांनीं पाणीपुरवठ्याची योजना आखली आणि अल्पावधींतच सरकारकडून १ लक्ष ५६ हजार रुपयांची मदत मिळविली. तसेंच, नागरिकांची व ग्रामपंचायतीची तितकीच रक्कम गोळा करून तहानलेल्या खेड गांवाला पाणी पुरवून तृप्त केलें. श्री. साहेबराव सातकरांच्या द्वारें खेड ग्रामपंचायतींत एक नवी आशा, एक नवें सामर्थ्य उदयाला आलें, आणि त्याचा परिणाम म्हणून विविध सहकाऱ्यांच्या साहाय्यानें सतत पांच वर्षे जिल्हा पंचायत स्पर्धेमध्यें खेड ग्रामपंचायतीनें पहिलें बक्षीस पटकावलें.

यानंतरच्या काळांत श्री. साहेबराव सातकरांचें कर्तृत्व ग्रामपंचायतीपुरतेंच मर्यादित राहिलें नाहीं. साधनविरहित जनतेला साधनसंपन्न करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या सहकारी चळवळीकडे त्यांचें मन आकर्षित झालें आणि त्यांच्या कर्तृत्वशक्तीला नवें क्षेत्र मिळालें. खेड तालुका को. ऑप. सोसायटीचे चेअरमन पासून खेड तालुका स. वि. संघ व खेड तालुका कॉ. ऑ. सुपरवायझिंग युनियनचे चेअरमनपर्यंत त्यांच्या कर्तृत्वशक्तीला वाव मिळाला आणि तिनें सारा खेड तालुका व्यापला.

खेड तालुक्यांतील त्यांचें नेतृत्व प्रभावी ठरल्यामुळें पुणें जिल्ह्यांतील जिल्हा पातळीवरचें नेतृत्व हळूहळू त्यांच्याकडे चालत आलें आणि पुणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन, पुणें जिल्हा सुपरव्हीजन कमिटीचें चेअरमन, पुणें जिल्हा सहकारी बोर्डाचे चेअरमन, शिवाय पुणें जिल्हा डेव्हलपमेंट बोर्ड, पुणें जिल्हा लोकलबोर्ड व पुणें जिल्हा स. वि. संघाचे डायरेक्टर होण्याचा मान त्यांना लाभला.

कर्तृत्ववान् माणसें संधि शोधत नाहींत तर संधि कर्तृत्ववान् माणसाला शोधत येते. याची प्रचीति श्री. साहेबराव सातकरांच्याबाबत पुन्हा एकदां आली आणि महाराष्ट्र राज्यांत सहकारी शिक्षण, प्रसार व प्रचाराची एकमेव जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे ते डायरेक्टर म्हणून पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळाकडून नियुक्त केलें गेलें. अशा प्रकारें मोहरीएवढ्या बीचें वटवृक्ष झाल्याचें दृश्य पुणें जिल्ह्याला दिसून आलें.

—ब. म. धुप, बी. ए.

---

### निर्यात न वाढविल्यास वाढत्या अडचणी

आंध्र प्रदेश चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेपुढें मि. जी. ए. मेजॉर ह्यांचें भाषण झालें. भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला ते फोर्ड फौंडेशनतर्फे सल्ला देत असतात. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, भारताला अधिक माल निर्यात करण्याची अतिशय गरज आहे. निर्यात वाढविली नाही, तर भारताला आयात करणेंहि अवघड जाईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३,७०० कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. पण हें उद्दिष्ट गांठण्याच्या कामीं अपयश आलें तर तिसऱ्या कार्यक्रमाचें बरेंच नुकसान होईल. उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल परदेशांतून आयात करतां येत नसेल तर त्याचें कारण निर्यातीचें प्रमाण पुरेसें नाहीं हेंच, आहे.

---

### गुजरातमधील काडी पैलवान विद्यार्थी

गुजरात विद्यापीठानें ३६ कॉलेजांतील ८,७४६ विद्यार्थी व १,६५९ विद्यार्थिनी ह्यांची वैयक्तीय तपासणी केली. विद्यार्थ्यांपैकी ३५% आणि विद्यार्थिनींपैकी २८% ह्यांचें वजन जरूरीपेक्षा कमी भरल्याचें त्यांत आढळून आलें. १७·६% विद्यार्थी आणि १५·१% विद्यार्थिनी ह्यांना नेत्रदोष होते.


## डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाताबागेसमोर, पुणें १.

**नवीन वर्षाकरितां सोमवार दि. १८ जून १९६२ पासून वर्ग सुरू झाले.**

जी. सी. डी., डी. कॉम., जी. डी. सी. ए, कॉस्टिंग, कंपनी सेक्रेटरी, एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स व बी. कॉम. डिग्री., शॉर्टहॅन्ड, इंग्रजी-मराठी टाईपरायटिंग, वगैरे.

★ एक वर्षाच्या जी. सी. डी. कोर्सची शेवटची बॅच.

★ वार्षिक रु. ११०० च्या आंत उत्पन्न असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठी जी. सी. डी. व जी. डी. सी. ए. कोर्ससाठी सरकारी फ्रीशिपस्.

★ सकाळ-संध्याकाळचे वर्ग.

### तेलाच्या कारखान्याची यंत्रसामग्री

लेनिनग्रॅड येथील इंजिनिअरिंगच्या कारखान्यांत भारतांत उभारण्यांत यावयाच्या एका तेल कारखान्याची यंत्रसामग्री तयार करण्यांत येत आहे. तेलशुद्धीच्या संकल्पित कारखान्यांत उत्तम प्रतीचें पेट्रोल तयार करण्यांत येईल. सोव्हिएट तंत्रज्ञांच्या साह्यानें कारखाना बहुधा गुजरातमध्यें उभारण्यांत येईल. पेट्रोलशिवाय रासायनिक कारखान्यांना लागणाऱ्या गॅसचा पुरवठाहि कारखाना करणार आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीची माहिती करून घेण्यासाठी भारतीय तंत्रज्ञांची एक तुकडी सध्यां लेनिनग्रॅड येथें मुक्कामास आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीचे आराखडे आणि ती तयार झाल्यावर कशी वापरावी ह्यासंबंधीचें शिक्षण सदर तुकडीला देण्यांत येत आहे. अशाच प्रकारचा आणखी एक कारखाना रशिआंत भारतासाठी तयार करण्यांत येत आहे.

---

### कोळशाच्या वहातुकीसाठी जलमार्गांचा उपयोग

उद्योगधंद्यांना लागणाऱ्या जळणाच्या कोळशाची वहातूक नीट न झाल्यामुळें कारखान्यांना नेहमीं अडचणी सोसाव्या लागतात. कोळशाच्या उत्पादनकेंद्रापासून त्याच्या खपाच्या केंद्रापर्यंत वहातूक सुरळीत व्हावी म्हणून भारत सरकारनें जलमार्ग व रस्ते ह्यांचा संयुक्त उपयोग करण्याचें ठरविलें आहे. बंगाल-बिहारमधील कोळशाच्या खाणींतून बाहेर काढलेला कोळसा प्रथम मालवाहू मोटारींनीं मोंघीर, भागलपूर, बखतिआरपूर, ह्या गंगेच्या कांठीं असलेल्या ठिकाणीं नेण्यांत येईल. तेथून गंगेच्या पात्रांतून तो अलाहाबादपर्यंत नेण्यांत येईल. ह्या वहातुकीसाठी घाग्रा नदीचाहि उपयोग करण्यांत येणार आहे. चालू पावसाळ्यांत वहातुकीचा हा प्रयोग प्रथमच करण्यांत येणार आहे.

---

### उकाई धरणामुळें निर्वासित झालेले आदिवासी

तापी नदीवर बांधण्यांत येणाऱ्या उकाई धरणामुळें ९,००० आदिवासी रहिवासी आपल्या जमिनीला मुकून निर्वासित बनणार आहेत. ह्या धरणामुळें १२४ खेड्यांच्या आसपासची सुमारें १,२०,००० एकर लागवडीखाली असणारी जमीन धरणाच्या पाण्याखाली बुडणार आहे. आदिवासींची पुनर्वसाहत करण्यासाठी जंगलाखालीं असलेली १२,००० एकर जमीन मोकळी करण्यांत यावी, अशी सूचना करण्यांत आली आहे. परंतु ह्या सूचनेला गुजरात राज्याच्या जंगल खात्याचा विरोध आहे. गुजरातमध्यें जंगलाखाली असलेली जमीन अगोदरच कमी आहे. वरील सूचना अंमलांत आणली तर जंगलाचें प्रमाण अधिकच कमी होणार आहे, असें खात्याचें म्हणणें आहे.

### कोळशाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दगडी कोळशाच्या उत्पादनाचें लक्ष्य ९·७ कोटी टन ठरविण्यांत आलेलें आहे. हें लक्ष्य वाढवून १०·४ कोटी टनांचें करण्यांत यावें असा सूर अलीकडे अधिकारी गटांत उमटूं लागला होता. परंतु नियोजन समितीनें ९·७ कोटी टनांचें लक्ष्यच कायम केलें आहे. उत्पादनाचें लक्ष्य केवळ कागदोपत्री वाढवून समाधान मिळविण्यापेक्षा आधी ठरविलेलें लक्ष्य गांठण्याकडे लक्ष केंद्रित करण्यांत यावें, असें आतां ठरविण्यांत आलें आहे. सरकारी मालकीच्या व खाजगी मालकीच्या कोळशाच्या खाणींच्या उत्पादनांत मेळ घालण्यासाठीं पुष्कळ प्रश्न सोडवावे लागणार आहेत. त्याशिवाय कोळशाच्या वाहतुकीच्या निरनिराळ्या मार्गांची एकसूत्रता कशी घडवून आणावी, हाहि प्रश्न आहेच.


## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ५१,५०० |

**बँक २ जुलै, १९६२ रोजीं स्टेट बँक ऑफ इंडियामध्यें विलीन होणार आहे.**

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज-वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

**पुणें कचेरी :**— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

)—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—(

श्री. म. व्यं. शिंगरे — अध्यक्ष
न. भू. ना. पां. थोपटे — उपाध्यक्ष
श्री. गो. बा. देवी
श्री. बा. ग. धंदुके

## दि बेळगांव बँक लिमिटेड

**रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव**

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| विक्रीस काढलेलें, खपलेलें व वसूल भांडवल | रु. | ८,००,००० |
| एकूण गंगाजळी | रु. | ५,४०,००० वर |
| ठेवी | रु. | १,९०,००,००० वर |
| एकूण जिंदगी | रु. | २,२१,००,००० |

**म्हैसूर आणि महाराष्ट्रांत पसरलेल्या २८ शाखा**

मुदती ठेवी आणि कॉल डिपॉझिट्स अत्यंत आकर्षक व्याजाच्या दरानें स्वीकारलीं जातात.

बँकेच्या तीन आणि पांच वर्षें मुदतीच्या कॅश सर्टिफिकेटांवर परतफेडीच्या वेळीं अनुक्रमें ४½% व ५% व्याज पडतें.

होम सेव्हिंग्ज ठेवी ३% दरानें स्वीकारल्या जातात.

एका वर्षाच्या आणि पांच वर्षांच्या मुदती ठेवींवर किमान व्याज अनुक्रमें ४% आणि ५%

बँकेला १९६१ सालीं २,२८,८२१ रु. १४ न. पैसे, म्हणजे पूर्वीच्या वर्षापेक्षा ५७,०९७ रु. ८३ न. पैसे जास्त नफा झाला. वाढलेल्या १०% करपात्र दरानें डिव्हिडंड वांटण्यांत आलें आहे.

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी. — मॅनेजिंग डायरेक्टर
बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी. — चेअरमन

### ग्रामपंचायतींत सर्वच्या सर्व स्त्रिया

भावनगर जिल्ह्यांतील पिपारिआ ह्या गांवाच्या पंचायतीवर सर्व जागांसाठी स्त्रिया निवडून आल्या आहेत. ग्रामपंचायतीवर सात सभासदांची निवड व्हावयाची होती. उभे राहणारे उमेदवार स्त्रियाच होत्या. त्यांना विरोध करणारे कोणीच उमेदवार उभे नसल्यामुळें सर्वांची निवड जाहीर करण्यांत आली.

### ऑस्ट्रियापासून कर्ज मिळण्याची शक्यता

भारताला आर्थिक मदत देणाऱ्या परदेशीय देशांपैकी ऑस्ट्रिआ ह्या देशाकडून कर्ज मिळण्याची शक्यता आहे अशी माहिती अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं लोकसभेंत सांगितली. कर्जाची रक्कम आणि तें ज्या कामाकरतां वापरावयाचें तें काम ह्यांच्या-बद्दल अद्याप चर्चा व्हावयाची आहे. भारताला मदत करणाऱ्या मित्रराष्ट्रांची बैठक पुन्हा लवकरच भरविण्यांत येणार आहे. ह्या बैठकींत मित्रराष्ट्रें आणखी किती मदत देण्यास तयार आहेत तें अधिक स्पष्ट होईल असा अंदाज आहे. गेल्या बैठकींत जादा मदतीचा प्रश्न मुद्दाम उपस्थित करण्यांत आला होता; परंतु निश्चित निर्णय न घेतां ती बैठक तहकूब झाली. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या यशासाठी भारताला परदेशीय मदतीची मोठी गरज आहे.

### काश्मीरमधील शारीरिक शिक्षणाची संस्था

खेळांचें व शारीरिक शिक्षण देणारी काश्मीरमधील पहिली संस्था लवकरच स्थापन होणार आहे. संस्थेच्या स्थापनेसाठी ५ लाख रुपये लागणार आहेत. संस्था चालविण्यासाठी लागणारें तांत्रिक साह्य भारत सरकारकडे व भारतामधील कांहीं खेळांच्या संस्थांकडे मागण्यांत आलें आहे. शाळा व कॉलेजमधील विद्यार्थ्यांना गिर्यारोहणाचें शिक्षण देण्याची सोय संस्थेंत करण्यांत येणार आहे. ह्या कामीं संस्था दार्जिलिंग येथील गिर्यारोहण संस्थेची मदत घेणार आहे.

### राजस्थानची शैक्षणिक प्रगति

मुंबई येथें मारवाडी विद्यालय ह्या संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यांत आला. राजस्थानचे मुख्यप्रधान श्री. मोहनलाल सुखाडिया समारंभाचे मुख्य पाहुणे होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, राजस्थान राज्य हें एके काळीं शिक्षणाच्या क्षेत्रांत मागसलेलें म्हणून गणलें गेलें होतें. परंतु गेल्या कांहीं वर्षांत राज्यांतील शिक्षणाची बरीच प्रगति झालेली आहे. आजमितीस राजस्थानांत ४,००० शाळा आहेत, व ९६ आर्टस व सायन्स कॉलेजें आहेत. त्याशिवाय वैद्यकीय व एंजिनिअरिंग कॉलेजेंहि आहेत. मुंबईमधील शिक्षणाच्या सवलतींत वाढ करण्याबाबत मारवाडी समाज मदत करीत आहे ही गोष्ट अभिमानास्पद आहे.



### सांताक्रूझ विमानतळावरील घसरपट्टी

सांताक्रूझ विमानतळावरील पूर्व-पश्चिम दिशेची मुख्य घसरपट्टी जेटवर चालणाऱ्या विमानांना धोक्याची वाटूं लागली आहे. ह्या पट्टीपैकी बराच भाग असावा तेवढा सपाट नसल्यानें वैमानिकांना चढता-उतरतांना काळजी वाटते, अशी तक्रार करण्यांत येत आहे. पट्टीखालील जमीन खचल्यानें सपाटी बिघडली असावी असा विमानतळावरील अधिकाऱ्यांचा दावा आहे. बिघडलेला भाग पुन्हा करण्यांत यावा अशी मागणी करण्यांत आली आहे.

### धूम्रपानाविरुद्ध मोहीम

धूम्रपानाविरुद्ध इशारा देणारें वाङ्मय ब्रिटनच्या आरोग्य व शिक्षणखात्यातर्फे तयार करण्यांत आलें आहे. त्यांत भिंतीवर लावण्याचा जाहिरातींचाहि समावेश आहे. ह्या जाहिराती ब्रिटनमधील कॉलेजें, दुय्यम शाळा, व युवकांच्या संघटना ह्यांच्याकडे पाठविण्यांत आल्या आहेत. धूम्रपानानें फुप्फुसाचा कॅन्सर होतो असा इशारा जाहिरातींत देण्यांत आला आहे.

### पोलंड व भारत ह्यांच्यामधील व्यापार

पोलंड व भारत ह्या दोन देशांमधील व्यापारी सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न करण्यासाठी भारतामधील एक प्रतिनिधिमंडळ चालू वर्षीत पोलंडला जाणार आहे. १९६० सालीं भारताबरोबर केलेल्या कराराप्रमाणें पोलंडनें भारताला १४·३ कोटी रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. हें कर्ज आतां जवळजवळ संपलें असून त्याचा उपयोग कोळशाच्या खाणींचा विकास करण्यासाठी झाला. पोलंड व भारत ह्यांच्यामधील व्यापार हळूहळू विस्तार पावत आहे.

### विमा कंपन्या

दि. ३१ डिसेंबर १९६१ रोजीं एक वा अधिक प्रकारच्या जनरल विम्याचें काम करणाऱ्या एकूण १५५ विमाकंपन्या भारतांत होत्या. त्यांपैकी ८२ भारतीय आणि ७३ परदेशी होत्या. भारतीय विमा कंपन्यांपैकीं ४० कंपन्यांच्या केंद्र कचेऱ्या महाराष्ट्रांत होत्या; व एकूण भारतीय विमा कंपन्यांच्या उत्पन्नापैकी ६८ टक्के उत्पन्न त्यांनाच मिळालें.

### प्राप्तिकर आकारणीसाठी माहिती सादर करण्याची नवी पद्धत

प्राप्तिकर आकारणीच्या चालू वर्षापासून सर्व करपात्र व्यक्तींनीं आपल्या उत्पन्नाची माहिती आपणहून ठराविक फॉर्ममध्यें भरून सादर करावयाची आहे. ही माहिती ३० जून १९६२ पूर्वी वा उद्योगधंद्यांपासून उत्पन्न येणाऱ्या व्यक्तींचे बाबतींत त्यांच्या हिशेबाच्या वर्ष अखेरनंतरचे सहा महिने संपण्यापूर्वी यांपैकी उशीराची तारीख असेल त्या तारखेपूर्वी सादर करावयाची आहे. कांहीं खास प्रकरणीं प्राप्तिकर–अधिकाऱ्यास अर्ज करून ही मुदत ठरवून दिलेल्या जास्तींतजास्त मुदतीपर्यंत वाढवितां येईल. तथापि ही नवी पद्धत सुरू करण्याचें हें पहिलेंच वर्ष असल्यानें ही माहिती सादर करण्याची मुदत अर्ज केल्याशिवायहि सर्व प्रकरणीं एका महिन्यानें वाढविण्याचें ठरलें आहे. या सवलतीमुळें करपात्र व्यक्तींस ही माहिती ३१ जुलै १९६२ पूर्वी, अथवा उद्योगधंद्यापासून उत्पन्न असलेल्याचे बाबतींत हिशेबाच्या वर्षअखेरनंतरचे सात महिने संपण्यापूर्वी, यांपैकी उशीराची तारीख असेल त्या तारखेपूर्वी पाठवितां येईल.

### लिमिटेड कंपन्यांच्या नेमणुका

पब्लिक वा प्रायव्हेट लि. कंपन्यांच्या डायरेक्टरांच्या नातेवाईकांना कंपन्यांत नफ्याच्या जागीं नेमण्यापूर्वी संबंधित कंपन्यांनीं तसा खास ठराव संमत करून घेतला पाहिजे, यासंबंधींच्या कंपनी कायद्यांतील तरतुदींकडे कंपनी कायदा कारभार खात्यानें कंपन्यांचें लक्ष वेधलें आहे. अशा नेमणुका आधीं करून घेऊन मग त्याच्या मंजुरीचे ठराव संमत करून त्या रीतसर करणें हें तरतुदीस धरून होत नाहीं आणि तसें चालणार नाहीं. कांहीं प्रायव्हेट लि. कंपन्यांत दरमहा ५०० रुपयांवरील पगाराच्या जागीं कंपनीच्या खास ठरावान्वयें आगाऊ मंजुरी घेण्यापूर्वीच डायरेक्टरांच्या नातेवाईकांच्या नेमणुका करण्यांत आल्या. तसेंच पात्र मुशाहिऱ्याव्यतिरिक्त कांहीं डायरेक्टर जादा पैसे घेत असल्याचेंहि आढळून आलें आहे. कांहीं कंपन्यांनीं या व्यवहारास मागाहून खास ठराव करून मंजुरी मागील दिनांकापासून घेतली आहे. असले प्रकार कंपनी कायद्याच्या ३१४ कलमाशीं विसंगत आहेत, ही गोष्ट कंपन्यांच्या निदर्शनास आणण्यांत येत आहे.

वाढत्या धंद्याकरितां
मर्यादित
मुदतीच्या ठेवी
घेणें आहेत.
The Travancore Ogale Glass, Mfg. Co. Ltd.
P. O. Udyogamandal,
(KERALA.)

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.